।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## EXAMINATION SECTION (PROFESSIONAL SECTION)

Phone: (02462) 229294
website: srtmun.ac.in e-mail: srtmundboee@gmail.com
examlawsrtmun@gmail.com

संदर्भ : परीक्षा/एम.फील/२०१९–२०/37 दिनांक : २९/०५/२०२०

प्रति,
**मा.प्राचार्य**
सर्व संलग्नीत एम.फील अभ्यासक्रम महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**मा. संचालक,**
सर्व शैक्षणिक संकुले,
प्रस्तुत विद्यापीठ.

**मा. संचालक,**
तंत्रशास्त्र संकुल (Computer Science)
व्यवस्थापनशास्त्र संकुल (Management Science)
उपकेंद्र, लातूर.

विषय : एम.फील. अभ्यासक्रमाच्या मौखिक परीक्षा (Viva voce) व लघुशोध प्रबंध सादर करणेबाबत....

संदर्भ : १) शासन पत्र क्र.संकीर्ण–२०२०/प्र.क्र..१२३/विशि–३, दि.८ मे, २०२०
२) मा.शिक्षण संचालक, पुणे यांचे पत्र क्र.युएनआय २०२०/बैठक विशि–१/४१३१अे, दिनांक ८ मे, २०२०.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रास अनुसरून, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, कोविड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे टाळेबंदी जाहीर केली असल्यामुळे मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महोदयांनी टाळेबंदी मुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्यासाठी राज्यस्तरीय समिती गठित केली होती. सदर समितीने राज्यातील विद्यापीठीय परीक्षांचे आयोजन करण्याबाबत केलेल्या शिफारशी राज्य शासनाने स्विकृत केल्या आहेत. शासनाने संदर्भीय पत्रान्वये सदर समितीच्या शिफारशीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता राज्यातील विद्यापीठांना कळविले आहे.

मागे पहा...२..

Scanned with CamScanner

सदर शिफारशी मधील परिच्छेद क्रमांक ६ व ७ बाबत खालीलप्रमाणे कळविल्यानुसार कार्यवाही करावी.

१) एम.फील लघुंशोध प्रबंध सादर झालेल्या व बहि:स्थ परीक्षकांकडून लघुशोध प्रबंध तपासून सकारात्मक शिफारस आलेल्या प्रबंधाच्या मौखिक परीक्षा पुढील सहा महिने Online घेण्यात यावेत.

२) ज्या विद्यार्थ्यांचे लघुंशोध प्रबंध सादर करण्याची मुदत मार्च—२०२० ते मे—२०२० च्या दरम्यान होती. परंतु कोविड—१९ मुळे लॉक डाऊन झाल्यामुळे ते आपला प्रबंध सादर करू शकले नाहीत. केवळ त्यांनाच त्यांच्या लघुशोध प्रबंध सादर करण्याच्या अंतिम दिनांकपासून पुढे सहा महिने कालावधी वाढवून देण्यात येते.

वरील दोनही बाबी कोविड—१९ च्या पार्श्वभूमीवर सहा महिन्यासाठी लागू राहतील याची नोंद घ्यावी व सदर बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून दयावी, ही विनंती.

आपला,

संचालक

परीक्षा व मुल्यमापन मंडळ

Scanned with CamScanner